देशोन्नती
चंद्रपूर | सोमवार | २८ सप्टेंबर २०२६

# डॉ.खत्री महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा



देशोन्नती वृत्तसंकलन

**चंद्रपूर** : स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर च्या सभागृहात दि. २४ सप्टेंबर २०२६ ला राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे आद. प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांची उपस्थिती होती. तसेच मंचावर कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक एन. एस. एस. चे सहकार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ. आर. यु. मूरमाडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. एस. चहारे, प्रा. करूणा खोब्रागडे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्रा. डॉ. मूरमाडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना, त्याची उद्दिष्टे व कार्य काय आहेत यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. काकडे यांनी एन. एस. एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रभावना जपणे काळाची गरज आहे, तसेच त्यांनी विद्यार्थ्यांची एन. एस. एस. मधील भूमिका व कर्तव्ये विशद केली. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे संचालन एन. एस. एस. चे सहकार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज निरंजन यांनी केले, तर आभार डॉ. आशिष चहारे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.